# समाज भूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २

**प्रथम सत्रांत परिक्षा २०१४-२०१५**

**विषय – मराठी अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास १८१८ ते १९६०**

**विशेषस्तर अभ्यासपत्रिका २ (S2)**

**वेळ - २ तास**

**द्वितीय वर्ष कला** **गुण - ६०**

**सूचना – १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. २) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.**

**प्र.१ कोणत्याही दहा प्रश्नांची उत्तरे २० शब्दात लिहा.** २०

१) मराठी भाषेतील पहिले मुद्रित पुस्तक कोणते ?
२) मुंबई विद्यापीठाची स्थापना केव्हा झाली ?
३) लोकहितवादी यांचे लेखन कोणत्या नावाने प्रसिद्ध होत असे.
४) अव्वल इंग्रजी कालखंडातील वैचारिक जागृती करणाऱ्या चार विचारवंतांची नावे लिहा.
५) कोणत्या निबंधकारास 'मराठी भाषेचे शिवाजी' म्हटले आहे ?
६) मराठीतील पहिले वृत्तपत्र कोणते ? कोणी सुरू केले ?
७) मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी कोणती ? कोणी लिहिली.
८) 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली सामाजिक कादंबरीचे कर्ते कोण ?
९) १८०० ते १८७० या कालखंडातील चार पौराणिक नाटकांची नावे सांगा.
१०) मराठीतील वाङ्मय सेवा करणाऱ्या दोन मासिकांची नावे लिहा.
११) १८१८-१८७५ या कालखंडातील कथासंग्रह कोणते ? दोन नावे लिहा.
१२) संगीत 'सौभद्र' या नाटकाचे लेखक कोण ?
१३) मराठीतील पहिल्या मासिकाचे नाव लिहा.
१४) १८७५ ते १९२० या कालखंडातील चार कवींची नावे सांगा.

**प्र.२ खालीलपैकी तीन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा.** १५

१) महाराष्ट्रात मुद्रण कलेचा आरंभ आणि स्वरूप स्पष्ट करा.
२) १८१८ ते १८७५ या कालखंडातील मराठीतील नियतकालिके.
३) १८१८ ते १८७५ या कालखंडातील निबंध वाङ्मयाचे स्वरूप.
४) कथा वाङ्मयाच्या १८१८-१८७५ या कालखंडातील प्रेरणा व स्वरूप स्पष्ट करा.
५) इ. स. १८७५ पूर्व मराठी काव्याचे स्वरूप कसे होते ?

**प्र.३ खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा.** १०

१) १८०० ते १८८५ या कालखंडातील भाषांतरित नाटके.
२) १८०० ते १८८५ या कालखंडातील सामाजिक कांदबऱ्याची प्रेरणा स्वरूप स्पष्ट करा.
३) १८७५ ते १९२० या कालखंडातील राष्ट्रीय जाणिवेच्या कविता.
४) ह. ना. आपटे यांचे कथालेखन क्षेत्रातील कार्य.
५) महाराष्ट्रातील नाट्यलेखन परंपरेची वाटचाल (१८४५ ते १८८५) थोडक्यात लिहा.

**प्र.४ खालीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर १५० शब्दात लिहा.** १५

१) इ. स. १८१८ ते १९२० या कालखंडातील सामाजिक कादंबरीच्या वाटचालीचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.
२) १८७५ ते १९२० या कालखंडातील काव्याच्या प्रेरणा सांगून काव्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

***